# महाराष्ट्र शासन,
# आदिवासी विकास विभाग
# नागरिकांची सनद



## आयुक्त
## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
## महाराष्ट्र राज्य,पुणे

२८,क्वीन्स गार्डन, नवीन सर्कीट हाऊस शेजारी, कॅम्प, पुणे ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६३६०९४१/२६३३०८५४
ई-मेल trti.mah@nic.in व est.trti-mah@nic.in
वेबसाईट trti.maharashtra.gov.in

# प्रस्तावना

आधुनिक भारताची सामाजिक, आर्थिक व राजकीय व्यवस्था व जडणघडण ही लोकशाही तत्वावरआधारभूत आहे. भारतीय राज्य घटनेनुसार या लोकशाही तत्वाचा पुरस्कार करण्यात आलेला आहे. लोकशाही तत्वावर आधारभूत राष्ट्रीयत्वाची व भावनिक एकात्मता निर्माण होण्यासाठी देशातील विविध सामाजिक समूहांना /व्यक्तींना विकासाची समानसंधी उपलब्ध करुन देणे ही काळाची गरज होती. देशातील ऐतिहासिक, भौगोलिक व सामाजिक परिस्थितीमुळे देशातील सर्व जाती-जमाती समूहांना शैक्षणिक, सामाजिक व राजकीय स्तरावर समान संधी उपलब्ध होत नसल्यामुळे दुर्गम भागात, दऱ्याखोऱ्यात वास्तव्य करुन राहत असलेले आदिवासी समूह हे विकासापासून वंचित राहिलेले आहेत. याचा विचार होऊन सर्व समूहांमध्ये समानता (Equity) निर्माण करण्यासाठी आणि मुख्य प्रवाहात नसलेल्या वंचित समाजाला मुख्य प्रवाहात आणून देशाच्या विकासात त्यांना सामावून घेऊन त्यांना आत्मसन्मान मिळवून देण्यासाठी स्वातंत्रप्राप्तीनंतर शासनाने विविध स्तरावर अनेक प्रयत्न सुरु केले.

महाराष्ट्र राज्यातील आदिवासी विकास विभागाकडे राज्यातील अनुसूचित जमातीच्या सर्वांगिन विकासासाठी जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या **९६८.८९** लाख असून यापैकी आदिवासी **८५.७७** लाख आहे. राज्यातील आदिवासी लोकसंख्योची टक्केवारी **८.९%** इतकी आहे.

**संस्थेची उदिष्टये आणि कार्ये :-**

१. केंद्र व राज्य शासनामार्फत आदिवासी समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासाकरिता राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आदिवासी जीवनावर झालेल्या परिणामांचे मूल्यमापन करणे.

२. आदिवासी जीवन व विकास यांचेशी संबंधित विषयावर संशोधन करणे

३. आदिवासी विकास विभागात कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचेकरिता सेवांतर्गत प्रशिक्षण तसेच आदिवासी विद्यार्थ्यांकरिता सेवापूर्व प्रशिखण कार्यक्रम राबविणे.

४. आदिवासीकरिता विविध प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करणे.

५. आदिवासी कला व संस्कृती जतन करण्याकरिता आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय चालविणे, हस्तकला प्रदर्शनाचे विविध शहरी भागात आयोजन तसेच आदिवासी जीवनावर लघुपटाची निर्मिती करणे.

६. महाराष्ट्र राज्यात क्षेत्रिय स्तरावर कार्यरत असलेल्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीच्या कामकाजावर प्रशासकीय नियंत्रण ठेवणे.

**संस्थेची प्रशासकीय संरचना**

आयुक्त हे या संस्थेचे प्रशासकीय प्रमुख आहेत. संस्थेच्या दैंनदिन कामकाजासाठी त्यांना सहाय्य करण्यासाठी सहसंचालक व उपसंचालक (एकात्मिक क्षेत्र विकास कार्यक्रम –एक्षेविका) (Intigrated Area Development Programe - IADP) ही दोन पदे कार्यरत आहेत.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे ही शासकीय संस्था दिनांक १ मे,१९६२ रोजी स्थापन करण्यात आली असून या संस्थेच्या अधिनस्त आठ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या कार्यरत आहेत. त्या पुढीलप्रमाणे ठाणे, पुणे, नाशिक, नंदूरबार, औरंगाबाद, अमरावती, नागपूर व गडचिरोली आहेत. "महाराष्ट्र अनुसूचिज जाती,अनुसूचिज जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२०००, (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ )" पारित करण्यात आला आहे व त्या अधिनियमाची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने "महाराष्ट्र अनुसूचिज जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियम)नियम, २००३" राज्यात लागू आहे. त्यानुसार अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती मार्फत अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी केली जाते.

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे या संस्थेचे संशोधन व प्रशिक्षण तसेच आदिवासी विकासाच्या अनुषंगाने उद्दिष्टांची प्रभावीपणे व गतीमान होण्यासाठी संस्थेला शासनाने दिनांक २४/१२/२०१३ च्या शासन निर्णयान्वये स्वायत्त संस्था म्हणून मान्यता प्रदान करण्यात आली. संस्थेची नोंदणी अधिनियम १८६०अंतर्गत नोंदणी क्रमांक महा.१४४३/२०१५, दिनांक २०/१०/२०१५ नुसार नोंदणी करण्यात आली आहे.तसेच संस्थेची नोंदणी सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अंतर्गत पंजीबध्द करुन धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी क्र.एफ-४६०६०/पी, दि.१९/१२/२०१५नुसार नोंदणी करण्यात आली आहे.

सदर बाबतीत संपर्क साधण्याकरीता अधिकारी व इतरही माहिती दर्शविणारी सोबतची अनुसूचित जमाती पडताळणी समिती कार्यालयाची नागरिकाची सनद तयार करण्यात आली आहे.

आदिवासी विकास विभागाची प्रशासकीय संरचना

↓

मा.मंत्री,आदिवासी विकास विभाग

↓

मा.राज्यमंत्री,आदिवासी विकास विभाग

↓

मा.सचिव,आदिवासी विकास विभाग

↓

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य,पुणे

↓

सहसंचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
पुणे

↓

- प्रशासन शाखा,
  ↓
  लेखाशाखा,
  ↓
  समन्वय,
  ↓
  संशोधन
  ↓
  प्रशिक्षण
  ↓
  संग्रहालय
- उपंसचालक (एक्षेविका)

↓

सहआयुक्त,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
पुणे,ठाणे,नाशिक,अमरावती,औरंगाबाद,
नागपूर,नंदूरबार,गडचिरोली.

↓

- विधी शाखा
- उपसंचालक(संशोधन)
- पोलीस दक्षता पथक

## १.अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्राचे प्रमाणपत्राची तपासणी करणे.

१. शासनाने अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांचा विकास होण्याच्या दृष्टीने अनेक सवलती जाहीर केलेल्या आहेत. अनेक बिगर आदिवासी व्यक्ती नामसादृश्याचा फायदा घेऊन या सवलतींचा लाभ घेत असल्याचे लक्षात आल्यावर या बाबींना आळा घालण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने कायदा व नियम राज्यात लागू केले आहेत. त्यानुसार;

"महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम,२००० अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने "महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडतळणीचे विनियम)नियम,२००३" राज्यात लागू आहे.

२. अधिनियमातील कलम २ च्या खंड (ख) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने जिल्हाधिका-यांकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा उपविभागीय अधिकारी (महसूल) किंवा यथास्थिती उपजिल्हाधिकारी यांना उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी अनुसूचित जमातीचे प्रमाणपज्ञत्र निर्गमित करणे याकरिता प्राधिका-यांकडून अनुसूचित जमाती प्रमाणपत्र मिळण्याची कार्यवाही सक्षम अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी किंवा प्रमाणपत्राचा अर्ज नाकारण्यासाठी सक्षम प्राधिका-याने अनुसरावयाची कार्यपध्दती व स्थलांतरीत व्यक्तींना अनुसूचित जमाती प्रमाणपत्र देणे याबाबतची तरतूद जमातीचे प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज सक्षम प्राधिका-याकडून फेटाळण्यात आला असेल, तर अर्जदारास तीस दिवसाच्या आत संबधीत अपिलीय प्राधिका-याकडे संबंधीत अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती अपील करण्यातची तरतूद नियम ८ मध्ये करण्यात आली आहे. उपरोक्त नियमामधील नियम, ३,४,५ मध्ये विशद करण्यात आलेली आहे.

याबाबत शासनाने अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांचे कामकाज ऑनलाईन करण्यासाठी नव्याने विकसीत करण्यात आलेल्या संगणकीकृत ऑनलाईन प्रणालीची अंमलबजावणी सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडून दिनांक १ मे,२०१६ पासून सुरू करण्यात आली आहे. सदर ऑनलाईन संगणकीकृत प्रणालीचे नामकरण **"आदि प्रमाण प्रणाली"** असे करण्यात आली आहे. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीसाठीचे अर्ज हे https://etribevalidity.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे अर्जाची सद्यस्थिती, सुनावणीचा दिनांक इत्यादीबाबत सविस्तर माहिती अर्जदारास उपलब्ध करुन घेता येईल.

३. सद्या राज्यात पुणे,ठाणे,नाशिक,अमरावती,औरंगाबाद,नागपूर,नंदूरबार व गडचिरोली या आठ ठिकाणी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या कार्यरत असून उपरोक्त अधिनियम व नियमातील तरतूदीनुसार अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडून अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रची तपासणी करण्यात येते.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीची कार्यालये व समितीचे अधिकारितेचे क्षेत्र खालीलप्रमाणे आहे.

## अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीची कार्यालये व समितीचे अधिकारितेचे क्षेत्र

| अ.क्र | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे नाव व दूरध्वनी क्रमांक | महसूल विभाग | कार्यक्षेत्रातील जिल्हे |
|---|---|---|---|
| १. | सहआयुक्त,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,पुणे कपील टॉवर्स,सी विंग पाचवा मजला आरटीओ कार्यालयाशेजारी,पुणे-४११००१दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५७९६१<br>Email-tcscpun.mah@nic.in | पुणे | पुणे,सातारा,सांगली, सोलापूर,कोल्हापूर |
| २. | सहआयुक्त,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,ठाणे एमटीएनल इमारत, ६ वा मजला,गणेश टॉकीलजवळ,चरई ठाणे (पश्चिम)- ४००६०१,दूरध्वनी क्रमांक : ०२२-२५८८३५०३<br>Email-tcsctha.mah@nic.in | कोकण विभाग | मुंबई शहर,मुंबई उपनगर,ठाणे, रायगड,रत्नागिरी,सिंधुदुर्ग |
| ३. | सहआयुक्त,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,नाशिक आदिवासी विकास भवन,जुना आग्रा रोड,नाशिक-४२२००२दूरध्वनी क्रमांक : ०२५३-२५७७०५९<br>Email-tcscnsk.mah@nic.in | नाशिक | नाशिक,अहमदनगर |
| ४. | सहआयुक्त,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, औरंगाबाद -४३१००३,प्लॉट नं.१० सेक्टर ई-१ सेंट लॉरेन्स हायस्कूलजवळ, सिडको बस स्टँण्डसमोर,औरंगाबाद ४३१००१<br>दूरध्वनी क्रमांक : ०२४०-२६६२९०१<br>Email-tcscaur.mah@nic.in | औरंगाबाद | औरंगाबाद, जालना,परभणी बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली |
| ५. | सहआयुक्त,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,अमरावती मा.राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयासमोर,सना बिल्डींग,चपराशीपुरा,अमरावती-४४४६०२दूरध्वनी क्रमांक : ०७२१-२५५०९९५<br>Email-tcscamr.mah@nic.in | अमरावती | बुलढाणा,वाशिम, अकोला,अमरावती, यवतमाळ, |
| ६. | सहआयुक्त,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,नागपूर आदिवासी विकास भवन,२रा माळा, आरटीओ ऑफिससमोर, अमरावती रोड, गिरीपेठ, नागपूर-४४००१० दूरध्वनी क्रमांक : ०७१२-२५६००३१<br>Email-tcscnagpur@gmail.com,<br>tcscngp.maharashtra@gov.in | नागपूर | वर्धा, नागपूर,भंडारा, गोंदिया |
| ७. | सहआयुक्त,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नंदूरबार शितकरण केंद्राची इमारत, आरटी ओ ऑफिसजवळ, साक्री रोड,नंदूरबार ४२५४१२<br>दूरध्वनी क्रमांक : ०२५६४-२१०१३०<br>Email-tcsca.ndb-mah@gov.in | नंदूरबार | नंदूरबार, जळगाव,धुळे |
| ८. | सहआयुक्त,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली जिल्हा परिषद कॉम्प्लेक्स एरिया एलआयसी चौक, प्रकल्प कार्यालयाच्या बाजूला,गडचिरोली-४४२६०५ दूरध्वनी क्रमांक : ०७१३२-२२३१७९२२३१८०,<br>Email-tcscgad@yahoo.in | गडचिरोली | चंद्रपूर,गडचिरोली |

४. सदर तपासणी समित्यांचे कामकाज हे उपरोक्त अधिनियम व नियम यांचे अनुषंगाने व माधूरी पाटील विरुध्द अपर आयुक्त,आदिवासी विकास,ठाणे व इतर (AIR 1995 SC 94) न्याय निर्णयामध्ये सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार चालते. कलम ८ मधील तरतूदीनुसार अर्जदार ज्या जातीचे,जमातीचे किंवा वर्गाचे आहेत, ते सिध्द करण्याची जबाबदरी असा दावा करणा-या अर्जदार व्यक्तीवर आहे. तपासणी किंवा वर्गाचे आहेत ते सिध्द करण्याची जबाबदारी असा दावा करणा-या अर्जदार व्यक्तीवर आहे. तपासणी समित्यांचे कामकाज न्यायिकवत (quasi judicial)असून उपरोक्त अधिनियमाच्या कलम ७(२) मध्ये पडताळणी समितीने दिलेला आदेश अंतिम असेल आणि याविरुध्द भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २२६ अन्वये उच्च न्यायालयाव्यतिरिक्त, कोणत्याही प्राधिकरणासमोर किंवा न्यायालयामध्ये आव्हान देता येणार नाही, अशी तरतूद आहे.

५. उपरोक्त अधिनियमातील कलम १० मध्ये जातीच्या खोट्या प्रमाणपत्राच्या आधारे प्राप्त करण्यात आलेले लाभ काढून घेण्याची सुस्पष्ट तरतूद आहे.

६. उपरोक्त अधिनियमातील कलम ११ मध्ये जातीच्या खोट्या माहिती सादर करुन किंवा खोटे विधान किंवा दस्तऐवज दाखल करुन किंवा अन्य कोणत्याही प्रकारच्या लबाडीने,जातीचे खोटे प्रमाणपत्र मिळवून अनुसूचित जमातीच्या व्यक्तींसाठी राखीव असलेल्य सवलतींचा लाभ घेत असेल अशा व्यक्ती विरुध्द अपराध व शास्तीची तरतूद आहे.

७. उपरोक्त अधिनियमातील कलम १३ मध्ये जातीचे खोटे प्रमाणपत्र देणा-यास शास्तीची तरतूद आहे.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्जदारास "महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याचे व ) (त्याच्या पडताळणीचे विनियमननियम,२००३ मधील कलम क्रमांक ११(२) मध्ये नमूद केलेली खालील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.

१. मूळ दस्तऐवज- एका साक्षांकित प्रतीसह, अर्जदाराचे मूळ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र

२. **नमुना –"फ"** मधील शपथपत्र

३. अर्जदाराच्या संदर्भातील दस्तऐवजांच्या साक्षांकित प्रती-

(एक) प्राथमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र.

(दोन) शाळा प्रवेशाच्या नोंदवहीचा उतारा

(तीन) जन्म नोंदवहीचा उतारा

४. वडीलांबाबतचे दस्तऐवज –

(एक) जन्म नोंदवहीचा उतारा

(दोन) प्राथमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र.

(तीन) शाळा प्रवेशाच्या नोंदवहीचा उतारा

(चार) अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र

(पाच) वडील सेवेत असल्यास, सेवा पुस्तकाच्या ज्या पृष्ठांवर धर्म व जमातीची नोंद असेल त्या पृष्ठांचा उतारा

(सहा) वडील अशिक्षित असल्यास, अर्जदाराच्या वडीलांच्या बाजूकडील वयस्क रक्तसंबंधीत नातेवाईकाचे प्राथमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र आणि शाळा प्रवेश नोंदवहीचा उतारा.

५. अन्य दस्तऐवज :-

(एक) जन्म नोंदवही,७/१२ चा उतारा, विक्री अभिलेख इत्यादी सारखा महसूली अभिलेख.

(दोन) त्याच्या अनुसूचित जमातीसंबंधीच्या दाव्याच्या पुष्टयर्थ असलेले अन्य कोणतेही संबंधीत दस्तऐवज

(तीन) अनुसूचित जमातीच्या दाव्याच्या पुष्टयर्थ अर्जदाराच्या जवळच्या ज्या नातेवाईकांची वैधता प्रमाणपत्रे सादर केली आहेत त्यांची शपथपत्रे

अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र प्राप्त करणे व त्याची पडताळणी करणे करीताचे विहित नमुना फॉर्म सोबत जोडले आहे.

उपरोक्त अधिनियम व नियमातील तरतूदींबाबत अधिक माहितीसाठी या कार्यालयाची वेबसाईट https://etribevalidity.mahaonline.gov.in/ पहावी. सोबत विहित नमुन्यातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीचे फॉर्म सोबत जोडले आहे.

---

संपर्क -: १. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

२. सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे/ठाणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर/नंदूरबार/गडचिरोली.

सेवा क्रमांक १

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी करणे

| अ.क्र | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| १. | सेवा पुरविणारा अधिकारी | आयुक्त,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे व सहआयुक्त,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे, ठाणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर,नंदूरबार, गडचिरोली. |
| २. | कायदे/नियम/शासन निर्णय/ज्या अंतर्गत सेवा पुरविल्या जातात | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांचे कामकाज "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२००० (२००१ चा महाराष्ट्र क्र.२३) मधील तरतूदी प्रमाणे चालते. हे अधिनियम व नियम महाराष्ट्र राज्यात सर्व ठिकाणी लागू आहेत. |
| ३. | थोडक्यात कार्यपध्दती | भारतीय घटनेतील कलम क्रमांक ४५ अन्वये आदिवासी जमातींच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीकरीता विविध तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच घटनेतील विविध तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच घटनेतील ३४३ कलमातील तरतूदी अन्वये विविध राज्यात राष्ट्रपतींच्या अध्यादेशाद्वारे विविध राज्याकरीता अनुसूचित जमातींची यादी जाहिर करण्यात आलेली आहे. यादीत समाविष्ट असलेल्या अनुसूचित जमातींना शासनाने जाहिर केलेल्या विविध शैक्षणिक व आर्थिक सवलतींचा विविध योजनेद्वारे लाभ होतो.<br>अनुसूचित जमातीचे लाभ अनुज्ञेय होण्याकरीता लाभार्थ्याकडे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक ठरते. अधिनियमातील कलम २ च्या खंड (ख) द्वारे प्रदान करण्यात आलेल्य अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने जिल्हाधिका-यांकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा उपविभागीय अधिकारी (महसूल) किंवा यथास्थिती उप जिल्हाधिकारी यांना उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. सक्षम प्राधिकारी यांचेकडून जातीचा दाखला प्राप्त करुन घेण्यासाठी कोणती कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे तसेच अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी किंवा प्रमाणपत्राचा अर्ज नाकारण्यासाठी सक्षम प्राधिका-यांने अनुसरावयाची कार्यपध्दती, अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज सक्षम प्राधिका-याकडून फेटाळण्यात आला असेल, तर अर्जदारास तीस दिवसाच्या आत संबंधीत अपीलीय अधिका-यांकडे अपील करण्याची तरतूद याबाबत सर्व कार्यपध्दती उपरोक्त नियमामधील **नियम ३,४ व ८** मध्ये विशद करण्यात आलेली आहे.<br>उपरोक्त नियमांमध्ये अनुसूचित जमातीचा दावा |

| | | |
|---|---|---|
| | | करणा-या व्यक्तीस अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठीची सर्व कार्यपध्दती नियम क्रमांक ११ व १२ मध्ये विशद करण्यात आलेली आहे. |
| ४. | सेवा मिळविण्यासाठी नागरिकांची पात्रता | अर्जदार हा भारतीय नागरीक असावा. तसेच अर्जदार अनुसूचित जमातीचा असावा व त्याचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र संबंधीत अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीने पडताळणी अंती वैध ठरविलेले असावे. |
| ५. | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | सोबत जोडला आहे. |
| ६. | अर्ज कुठे उपलब्ध आहे. | ऑनलाईन https://etribevalidity.mahaonline.gov.in/ हया लिंकवर |
| ७. | अर्जाची किंमत असल्यास किती | अर्ज ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. |
| ८. | शुल्क भरावे लागते काय? किती | नाही |
| ९. | कोणती कागद पत्रे जोडावयाची | अनुसूचित जमाती प्रमाणपत्रे प्राप्त करण्याकरीता उपरोक्त नियमामधील **नियम ३(३)** नुसार अर्जदाराने कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र पडताळणी करुन घेण्याकरीता अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र तपासणी समितीस उपरोक्त नियमातील तरतूद क्रमांक **११(२)** मध्ये नमूद केलेली कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. |
| १०. | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठीचा अर्ज संबंधीत सक्षम प्राधिकारी १ महिन्याच्या कालावधीत निकाली काढतील.<br>अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र पडताळणीकरीता अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीस प्राप्त झाल्यांनतर अर्जदाराचा दावा सत्य असल्याबाबत समितीस खात्री पटल्यास समिती वैधता प्रमाणपत्र निर्गमित करील. अर्जदाराचा दावा समाधानकारक आढळून न आल्यास समिती प्राप्त प्रकरणी नियमातील नियम क्रमांक १२ मध्ये नमूद केलेल्या तरतूदीचा वापर करुन निर्णय घेईल. |
| ११. | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल, तो अधिकारी (अपिलीय अधिकारी) व त्यांचा दूरध्वनी क्रमांक | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र निर्गमित करण्यास संबंधीत उपविभागीय अधिका-यांनी नकार दिल्यास त्यांचे निर्णयविरुध्द संबंधीत कार्यक्षेत्रातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे उपरोक्त नियमातील कलम ८(१) अन्वये अपील करण्याची तरतूद आहे.<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीने अर्जदाराने प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास अर्जदारास संबंधीत मा.उच्च न्यायालयात दार मागता येते. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी कार्यक्षेत्र, पत्रव्यवहाराचा पत्ता संशोधन अधिकारी,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे -१ ०२०-२६३३३७४३ |

| | | |
|---|---|---|
| | | |
| १२. | अपिलीय अधिकारी यांच्याकडे तक्रार निकाली काढण्यासाठीचा कालावधी | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे प्राप्त झालेल्य अपिल प्रकरणी समिती तीन महिन्याच्या कालावधीमध्ये योग्य् व उचित आदेश निर्गमित करेल.<br>मा. उच्च न्यायालयात अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीच्या निर्णयविरुध्द दाखल होणा-या याचिका प्रकरणात मा.उच्च न्यायालय प्रचलित पध्दतीने कार्यवाही करते. |

*****

नमुना " अ "

[नियम ३ (१) पाहा]

## अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्जाचा नमुना

प्रति

जिल्हाधिकारी किंवा
उप विभागीय अधिकारी (महसूल)
किंवा
उप जिल्हाधिकारी (प्राधिकृत).

विषय.—अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत.

महोदय,

मी खाली सही करणार ........................................................................ अर्ज करतो/करते की, माझ्या स्वतःसाठी, माझ्या मुलां/मुलींसाठी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने माझ्या जमातीच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ मी पुढील माहिती सादर करीत आहे :—

१ (अ) अर्जदाराचे पूर्ण नाव :
सध्याचा पत्ता :
गावाचे नाव :
तहसील व जिल्हा :
डाक कार्यालयाचे नाव :
(ब) सध्याचा व्यवसाय :
(क) परंपरागत व्यवसाय :

२ (अ) वडिलांचे पूर्ण नाव व पूर्ण पत्ता (वडील हयात नसल्यास, त्यांच्या निवासस्थानाचा शेवटच्या ठिकाणाचा पत्ता) :
(ब) सध्याचा व्यवसाय :
(क) परंपरागत व्यवसाय :

३. (अ) (एक) अनुसूचित जमातीचे नाव

(दोन) पोट-जमात

(ब) (एक) मातृ-भाषा

(दोन) बोली-भाषा

४. प्रमाणपत्राची आवश्यकता असलेल्या व्यक्तीबाबतची माहिती. :

(अ) अर्जदाराचे मूळ गाव (ठिकाण)/तहसील/ जिल्हा (६ सप्टेंबर, १९५० रोजी किंवा त्या विशिष्ट जमातीच्या अधिसूचनेच्या दिनांकास जेथे अर्जदाराचे कुटुंब राहात होते ते ठिकाण.) :

(ब) जर व्यक्ती तिच्या मूळ गावाव्यतिरिक्त इतर गावात (निवासस्थानाच्या सर्वसाधारण ठिकाणी) राहात असल्यास, त्या गावाचे नाव :

(क) मूळ गाव सोडल्याचे वर्ष

(ड) मूळ गाव सोडल्याची कारणे (म्हणजे शिक्षण, नोकरी इत्यादी). :

(ई) सध्याच्या गावातील वास्तव्याची कारणे (म्हणजे शिक्षण, नोकरी इत्यादी). :

(फ) जन्म ठिकाण :

(ग) जेथे त्याने/तिने शिक्षण घेतले त्या प्राथमिक शाळेचे नाव-गाव तहसील, जिल्हा. :

(ह) जेथे त्याने/तिने शिक्षण घेतले त्या माध्यमिक शाळेचे/ महाविद्यालयाचे नाव-गाव, तहसील, जिल्हा. :

५. (१) त्याच्या अनुसूचित जमातीच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ पुरावा :

(अ) (एक) अर्जदाराचा, त्याच्या/तिच्या वडिलांचा किंवा वडिलांच्या बाजूकडील वयस्क नातेवाईकाचा जन्म नोंदवहीतील उतारा. :

(दोन) अर्जदाराचा, उपलब्ध असल्यास त्याच्या वडिलांचा किंवा आजोबांचा प्राथमिक शाळा प्रवेश नोंदवहीतील उतारा. :

(तीन) अर्जदाराचा व त्याच्या/तिच्या वडिलांचा प्राथमिक शाळा सोडल्याचा दाखला.

(ब) अशा अनुसूचित जमातीच्या अधिसूचनेच्या दिनांकापूर्वी अनुसूचित जमातीच्या व निवासस्थानाच्या सर्वसाधारण ठिकाणासंबंधी लेखी पुरावा. :

(क) अर्जदाराचे वडील किंवा रक्ताचे नातेवाईक शासनाच्या सेवेत किंवा इतर कोणत्याही सेवेत असल्यास, त्यांचा जमातीचा उल्लेख असलेला सेवा अभिलेखातील (पुस्तकातील) उतारा :

(ड) अनुसूचित जमाती छाननी समितीकडून दिलेले अर्जदाराच्या वडिलांचे किंवा काकांचे किंवा वडिलांच्या बाजूकडील इतर कोणत्याही वयस्क नातेवाईकांचे असल्यास, वैधता प्रमाणपत्र. :

(ई) असल्यास, महसूली अभिलेख किंवा ग्रामपंचायतीतील अभिलेख. :

(फ) असल्यास, इतर संबंधित लेखी पुरावा :

(२) अतिरिक्त माहिती :

(अ) अर्जदाराचे नातेवाईक राहात असलेल्या ५ गावांची नावे. :

२५

(ब) अनुसूचित जमातीच्या देवदेवतांची नावे

(क) ज्या व्यक्तीने धर्मांतर केले असेल ती व्यक्ती धर्मांतरापूर्वी पूजा करीत असलेल्या देवदेवतांची नावे. :

६. अर्जदाराच्या वडिलांचे/आजोबांचे मूळ गाव, तहसील व जिल्हा. :

७. असल्यास, अर्जदाराच्या मूळ गावासंबंधीचा पुरावा :

८. (अ) वडिल किंवा जवळचे नातेवाईक यांनी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र किंवा शासकीय सवलती घेतल्या आहेत काय ? :

(ब) नमुना अ-१ मधील अर्जासोबत जोडावयाचे शपथपत्र. :

९. (अ) अर्जदाराने अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडे पूर्वी अर्ज केलेला आहे काय ? (महाराष्ट्र राज्यातील किंवा इतर राज्यातील सक्षम प्राधिकारी धरून). केला असल्यास, कोणाकडे व केव्हा ? (प्रत जोडावी). :

(ब) छाननी समितीकडून देण्यात आलेले अर्जदाराच्या वडिलांचे किंवा वडिलांच्या बाजूकडील इतर कोणत्याही वयस्क नातेवाईकांचे वैधता प्रमाणपत्र.

तसे असल्यास कोणाला व केव्हा देण्यात आले (सत्य प्रत जोडावी).

मी, शपथपूर्वक असे घोषित करतो/करते की, या अर्जात माझ्याकडून देण्यात आलेली माहिती खरी आहे. नंतर ती, खोटी असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहितेचे कलम १९३(२), १९९ व २०० यांच्या तरतुदींनुसार माझ्यावर खटला भरण्यात येईल व तदनुसार शिक्षा करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

आपला,

ठिकाण .................

(अर्जदाराची सही)

दिनांक .................

210

नमुना "इ" [ नियम ११ (१) पाहा ]

## अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची तपासणी करण्यासाठी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे सादर करावयाचा अर्ज

प्रति,

**सहआयुक्त तथा उपाध्यक्ष,**
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
_____________________ विभाग,_______________

**विषय : अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची तपासणी करण्याबाबत**

महोदय,

मी खाली सही करणार (नाव) ______________________________________________
(शिक्षण/सेवा/निवडणूक/इतर) ____________________ या कारणासाठी माझ्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्राची (दावा) तपासणी करण्याची विनंती करीत आहे. मी माझ्या अनुसूचित जमातीच्या दाव्यापुष्ट्यर्थ पुढील माहिती आणि दस्तऐवज सादर करीत आहे. मूळ प्रमाणपत्र त्याची तपासणी झाल्यानंतर कृपया मला परत करावे.

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव : ______________________________

सध्याचा पत्ता : ______________________________
गाव/नगर/तहसील व जिल्हा आणि टपाल कार्यालयाचे नाव व दूरध्वनी क्रमांक.
तालुका ______________________________
जिल्हा ______________________________
पिनकोड

२. अर्जदाराच्या वडिलांचे संपूर्ण नाव आणि कायमचा पत्ता (वडील हयात नसतील तर त्यांच्या शेवटच्या निवासस्थानाचा पूर्ण पत्ता नमूद करणे). ______________________________
तालुका ______________________________
जिल्हा ______________________________
पिनकोड

३. अर्जदाराच्या वडिलांचा सध्याचा व्यवसाय, पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक. ______________________________
______________________________
______________________________

४. वडील नोकरी करीत असतील तर त्यांचे पद आणि दूरध्वनी क्रमांकासह नोकरीचा पत्ता. ______________________________
______________________________
______________________________

५. वडिलांचे शिक्षण : ______________________________

६. कुटुंबाचा परंपरागत व्यवसाय : ______________________________

७. अर्जदाराने दावा केलेली अनुसूचित जमात/पोट-जमात/जमातीचा भाग किंवा गट. ______________________________

८. (अ) अर्जदाराची मातृभाषा :

(ब) बोलीभाषा :

(क) देव/देवी :

(ड) अर्जदाराच्या नातेवाईकांची/जमातीतील व्यक्तींची पाच आडनावे.

९. (अ) अर्जदाराचे मूळ ठिकाण, पोस्ट, तहसील, जिल्हा.

ठिकाण

पोस्ट

तालुका

जिल्हा

(ब) त्याने ते ठिकाण सोडले असेल तर ते कधी व कोणी सोडले तसेच त्याचे कारण.

(क) ठिकाणाचे नाव (दिनांक ६ सप्टेंबर १९५० रोजी अर्जदाराचे वडील/आजोबा जेथे राहात होते ते गाव/नगर/शहर, तालुका आणि जिल्हा).

ठिकाण

पोस्ट

तालुका

जिल्हा

१०. (अ) अर्जदार सध्याच्या ठिकाणी केव्हापासून राहत आहे आणि त्याने त्याचे मूळ ठिकाण सोडल्याची कारणे.

(ब) सध्या मूळ ठिकाणी कोण राहत आहे, त्याचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक.

(क) मूळ गावी घर, जमीन आहे का ?:

(ड) जमीन असल्यास ७ x १२ चा उतारा आहे का ? महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६, याच्या कलम ३६, ३६-क अन्वये जमिनीची नोंद घेण्यात आली आहे का ?

११. अर्जदाराने ज्या प्राधिकाऱ्याकडून त्याचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र घेतले तो प्राधिकारी आणि प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक. ____________________

१२. अर्जदाराने त्या दस्तऐवजाच्या आधारे सक्षम प्राधिकाऱ्याकडून अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळविलेले आहे तो दस्तऐवज. ____________________

१३. अर्जदार ज्या विद्याशाखेत सध्या शिकत आहे त्या शाखेचे नाव, वर्ष, शैक्षणिक संस्थेचे नाव, दूरध्वनी क्रमांकासहित तिचा पत्ता. ____________________

तालुका ____________________

जिल्हा ____________________

१४. अर्जदाराने ज्या शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेतले/शिक्षण घेत आहे त्याबाबतची माहिती –

| अ. क्र. | शिक्षणाचे टप्पे | शैक्षणिक संस्थेचे नाव व पत्ता | शिक्षणाचा कालावधी |
|---|---|---|---|
| अ | प्राथमिक शिक्षण (इयत्ता पहिलीपासूनची उचित माहिती देणे) | | |
| ब | माध्यमिक शिक्षण | | |
| क | महाविद्यालयीन शिक्षण | | |

१५. अर्जदाराचे वडील ज्या शैक्षणिक संस्थेत शिकत होते त्याची माहिती –

| अ. क्र. | शिक्षणाचे टप्पे | शैक्षणिक संस्थेचे नाव व पत्ता | शिक्षणाचा कालावधी |
|---|---|---|---|
| अ | प्राथमिक शिक्षण (इयत्ता पहिलीपासूनची उचित माहिती देणे) | | |
| ब | माध्यमिक शिक्षण | | |
| क | महाविद्यालयीन शिक्षण | | |

१६. (अ) अर्जदाराच्या कुटुंबातील ज्यांनी शिक्षण घेतले असेल त्या सदस्यांची नावे (म्हणजेच वडील, काका, मोठा भाऊ, बहीण, सख्खे काका).

(ब) उपरोक्त सदस्यांपैकी कोणत्याही व्यक्तीने अनुसूचित जमात प्रमाणपत्र मिळविले आहे का आणि ते अनुसूचित जमातीच्या लाभाचा फायदा घेत आहेत का, जर होय तर केव्हापासून आणि कसे ?

१७. (अ) यापूर्वी कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या अनुसूचित जमात प्रमाणपत्राची तपासणी करण्यात आली होती का, जर होय तर कुटुंबातील सदस्याचे नाव, त्याचे अर्जदाराशी नाते आणि तपासणी का व केव्हा करण्यात आली ?

| सदस्याचे नाव | अर्जदाराशी नाते | वर्ष |
|---|---|---|
| | | |
| | | |

(ब) वैधता प्रमाणपत्र मिळविले असल्यास, त्याचा क्रमांक व दिनांक (प्रत जोडणे).

१८. नोकरीच्या कारणास्तव अनुसूचित जमात प्रमाणपत्राची (दावा) पडताळणी करावयाची असल्यास, अर्जदाराच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याचे पद, पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक नमूद करणे.

(अ) निवड केल्याचा दिनांक :

(ब) सेवेत रुजू झाल्याचा दिनांक :

(क) पदोन्नती मिळाली असल्यास, पदोन्नतीचा दिनांक.

(ड) सध्याच्या कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक.

१९. निवडणुकीच्या कारणास्तव अनुसूचित जमात प्रमाणपत्राची (दावा) पडताळणी करावयाची असल्यास, निवडणुकीची माहिती देणे.

| | | |
|---|---|---|
| अ | निवडणुकीचा प्रकार, ठिकाण, तालुका, जिल्हा | |
| ब | निवडणुकीचा दिनांक | |
| क | मतदार संघाचे नाव व क्रमांक | |

२०. पुढील दस्तऐवज जोडण्यात यावेत. आवश्यक (मूळ प्रमाणपत्र व त्याच्या साक्षांकित प्रती)

(अ) मूळ दस्तऐवज

| क्रमांक | तपशील | जोडण्यात आले आहेत/नाहीत |
|---|---|---|
| १ | साक्षांकित प्रतीसह अर्जदारांचे **अनुसूचित जमात प्रमाणपत्र** | |
| २ | शपथपत्र | |

(ब) अर्जदाराबाबतच्या दस्तऐवजाच्या साक्षांकित प्रती

| क्रमांक | तपशील | जोडण्यात आले आहेत/नाहीत |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे प्राथमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र | |
| २ | शाळा प्रवेश नोंदवहीचा उतारा | |
| ३ | जन्म व मृत्यू नोंदवहीचा उतारा | |

(क) अर्जदाराच्या वडिलांबाबतच्या दस्तऐवजाच्या साक्षांकित प्रती

| क्रमांक | तपशील | जोडण्यात आले आहेत/नाहीत |
|---|---|---|
| १ | प्राथमिक शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र | |
| २ | शाळा प्रवेश नोंदवहीचा उतारा | |
| ३ | जन्म व मृत्यू नोंदवहीचा उतारा | |
| ४ | विहित नमुन्यातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र | |
| ५ | सेवेत असल्यास, त्याच्या सेवा पुस्तकात अनुसूचित जमात दर्शविणाऱ्या पहिल्या पृष्ठाचा/पृष्ठांचा उतारा. | |
| ६ | वडील अशिक्षित असतील तर अर्जदाराच्या सख्ख्या वयस्कर रक्ताचे नाते असलेल्यांचा प्राथमिक शाळा प्रवेश नोंदवहीचा उतारा | |

(ड) अन्य दस्तऐवज

| क्रमांक | तपशील | जोडण्यात आले आहेत/नाहीत |
|---|---|---|
| १ | जन्म नोंदवही | |
| | विक्री विलेख (सेल डीड), | |
| | ७ x १२ चा उतारा इत्यादींसारखे महसुली अभिलेख | |
| २ | अर्जदाराच्या अनुसूचित जमात दाव्याच्या पुष्ट्यर्थ, ज्याचे वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे, अशा वडिलांच्या बाजूकडील जवळच्या नातेवाईकांचे शपथपत्र. | |
| ३ | अर्जदाराने पित्याच्या बाजूकडील कोणाचेही प्रमाणपत्र वैध किंवा अवैध ठरविले असल्यास, त्याच्या तपशिलासह त्या बाबतीतील माहिती नमूद करणारे, रीतसर करुन दिलेले शपथपत्र. | |
| ४ | अर्जदाराच्या अनुसूचित जमात प्रमाणपत्राच्या दाव्या पुष्ट्यर्थ, अन्य कोणतेही संबंधित पुरावे/दस्तऐवज. | |

वरीलपैकी कोणताही दस्तऐवज उपलब्ध नसल्यास, तो दस्तऐवज उपलब्ध नसल्याची कारणे नमूद करणे.-

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

मी, पडताळणी करण्यासाठीच्या अर्जाबाबत, मूळ दस्तऐवज आणि वरीलप्रमाणे त्याच्या साक्षांकित प्रती सादर करीत आहे. मी शपथपूर्वक असे लेखी जाहीर करतो की, मी अर्जात भरलेली माहिती माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

ठिकाण :

आपला,

दिनांक :

(अर्जदाराची सही)

(अर्जदाराच्या वडिलांची/पालकांची सही)

नमुना "फ"

[ नियम ११ (२) (अ) पाहा ]

## अर्जदाराने अनुसूचित जमात प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी केलेल्या अर्जाच्या नमुन्यासोबत छाननी समितीला सादर करावयाचे शपथपत्र

मी, ____________________________________________

श्री. ____________________________________________ यांचा

मुलगा/मुलगी/पत्नी वय वर्षे, व्यवसाय ______________, राहणार ______________,

तहसील ____________, जिल्हा ______________, महाराष्ट्र राज्य याद्वारे प्रतिज्ञापूर्वक पुढीलप्रमाणे कथन करतो की,

मी, ______________________ या अनुसूचित जमातीचा आहे. मी ______________ धर्माचा आहे. ______________________ यांनी दिनांक ______________ रोजी दिलेल्या क्रमांक ______________ च्या माझ्या अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी मी अर्ज केलेला आहे.

***माझ्या वडिलांच्या बाजूकडील कोणत्याही नातेवाईकाचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र तपासणी समितीकडून कधीही अवैध ठरलेले नाही.**

*अर्जासोबत माझ्या वडिलांच्या बाजूकडील पुढील नातेवाईकांचे वैध/अवैधतेसंबंधीचे दस्तऐवज जोडत आहे.

| अ. क्र. | नातेवाईकाचे नाव | उमेदवार/अर्जदाराशी नाते |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |

ज्या नातेवाईकांची वैधता प्रमाणपत्रे या अर्जासोबत जोडली आहेत, त्यांच्याशी असलेले, वर नमूद केलेले नाते दर्शविणारा **वंशवृक्ष/वंशावळ** सोबत जोडलेला आहे.

अर्जासोबत जे कोणतेही दस्तऐवज जोडण्यात आले आहेत आणि अर्जामध्ये ज्या प्रकारची माहिती मी पुरविलेली आहे, ती माझ्या संपूर्ण माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

सही

(अर्जदाराचे नाव)

*लागू नसेल ते खोडावे.

नमुना "फ" मधील शपथपत्रामध्ये खालीलप्रमाणे वंशवृक्ष/वंशावळीची माहिती द्यावी.

## वंशवृक्ष/वंशावळ

श्री. ____________________

(खापर पणजोबा)

श्री. ____________________

(पणजोबा)

श्री. ____________________ (आजोबा)

श्री. ____________________ (चुलत आजोबा)

**(आजोबा) यांची मुले:**

श्री. ____________ (वडील)

श्री. ____________ (चुलते)

श्रीमती ____________ (आत्या)

**(चुलत आजोबा) यांची मुले:**

श्री. ____________ (चुलत चुलते)

श्रीमती ____________ (चुलत आत्या)

**(चुलते) यांची मुले:**

श्री. ____________ (चुलत भाऊ)

श्रीमती ____________ (चुलत बहीण)

**(चुलत चुलते) यांची मुले:**

श्री. ____________ (चुलतचुलत भाऊ)

श्रीमती ____________ (चुलतचुलत बहीण)

**(वडील) यांची मुले:**

श्री. ____________ (उमेदवार)

श्री. ____________ (भाऊ)

श्रीमती ____________ (बहीण)

(वडील/पालक स्वाक्षरी)

स्थळ :

दिनांक :

(उमेदवाराची/अर्जदाराची स्वाक्षरी)

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था**

**महाराष्ट्र राज्य**

**नागरिकांची सनद**

**तक्ता क्र.1**

| अ.क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी /कर्मचारी यांचे नांव हुददा | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-यांचे नांव व हुददा |
|---|---|---|---|---|
| 1 | सेवांतर्गत व सेवापुर्व प्रशिक्षण देणे | अधिव्याख्याता, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-1 | • सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी विहित मुदत नाही. राज्य प्रशिक्षण धोरणात नमूद केलेनुसार प्रशिक्षणाच्या प्रकारानुसार प्रशिक्षणाचा कालावधी निश्चित केला जातो. वार्षिक प्रशिक्षण आराखड्यानुसार विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी<br>• अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता संघ / महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून ( UPSC / MPSC) द्वारा घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम ९ विद्यापीठे व यशदा, पुणे येथे ११ महिन्यांच्या कालावधीकरीता प्रत्येक विद्यापीठात २५ व यशदा येथे १० असे एकूण २३५ उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येते<br>अ) सदर प्रशिक्षणा दरम्यान पुढील सोई-सुविधा उमेदवारांना उपलब्ध करुन दिल्या जातात.<br>ब) विद्यावेतन रु. ६,००० /- प्रतिमाह (यात निवास व भोजनाचा समावेश आहे.)<br>क) शैक्षणिक साहित्य / पुस्तके खरेदीसाठी रु. ६,००० /- ( फक्त एकदाच ) | सहसंचालक दुरध्वनी क्रमांक 020/26362772 |

२५

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी पदवीधर असलेल्या उमेदवारांची निवड राज्य स्तरीय प्रवेश परीक्षा (CET) घेऊन करण्यात येते. सदरची प्रवेश परीक्षा दरवर्षी मार्च मध्ये घेतली जाते व हे प्रशिक्षण दरवर्षी ऑगस्ट महिन्यात सुरु होते.<br><br>• अभियांत्रिकी आणि न्यायिक सेवा यांचेसाठी देखील अनुक्रमे ३ महिने आणि १ वर्ष कालावधीचे प्रशिक्षण दिले जाते. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता प्रत्येक महसूल विभागातील प्रशिक्षणार्थी बार कौंन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा (बीएसजी) या संस्थेमार्फत निवडले जातात. प्रत्येक आठवडयात शनिवार व रविवार असा दोन दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम असतो. सदरच्या प्रत्येक दिवशी प्रश्नोत्तराचे सत्र असतील.<br>त्याचप्रमाणे अनुसूचित जमातीतील अभियांत्रिकी पदवीधर ज्या उमेदवारांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अभियांत्रिकी सेवा स्पर्धा परीक्षेसाठी अर्ज केले आहेत अश्याच उमेदवारांना सदरचे प्रशिक्षण महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक यांच्या अधिनस्त असलेल्या १. मेटा प्रशिक्षण केंद्र, नाशिक २. मेटा, प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, नागपूर या संस्थेमार्फत देण्यात येईल. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | सदर संस्थेमार्फत उपरोक्त प्रशिक्षणा दरम्यान उमेदवारांची राहण्याची व जेवणाची व्यवस्था व शैक्षणिक साहित्य इ. सोई-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील.<br><br>• संघ लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा पूर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षा व मुलाखत तयारी करिता प्रोत्साहन म्हणून आर्थिक मदत देण्यात येते.<br>सदर योजनेमध्ये प्रशिक्षणार्थींना दर महा १२,००० असे एकूण तीन महिन्यासाठी ३६,००० व पुस्तक संच खरेदी करण्यासाठी फक्त एकदाच एकूण १४,००० असे एकूण रु. ५०,००० इतकी रक्कम देण्यात येते. त्याचप्रमाणे मुलाखत तयारी करिता प्रोत्साहन मदत म्हणून प्रती प्रशिक्षणार्थींना दर महा १२,००० असे एकूण दोन महिन्यासाठी एकूण रु. २४,००० इतकी रक्कम देण्यात येते.<br><br>• संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा पूर्व, मुख्य परीक्षा व मुलाखत तयारी करिता दिल्ली व महाराष्ट्रातील नामांकित खाजगी प्रशिक्षण संस्थांद्वारा १ वर्ष कालावधीकरिता प्रशिक्षण देणे.<br><br>सदर प्रशिक्षणासाठी प्रवेश परीक्षा घेऊन गुणानुक्रमे निवड यादी व प्रतीक्षा यादी प्रकाशित केली जाईल या योजनेमधील सोई – सुविधा : | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | अ) दिल्ली मधील संस्थेत प्रशिक्षणार्थ्यांस दर महिन्यास रुपये १२,००० इतके विद्यावेतन देण्यात येईल. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संस्थेत प्रशिक्षण घेत असल्यास प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यास दर महिन्यास रुपये ८,००० इतके विद्यावेतन देण्यात येईल.<br>आ) पुस्तक खरेदी करीता प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यास एकदाच रुपये १४,००० /- देण्यात येईल.<br><br>• विविध सरळ सेवा भरती सेवा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणासाठी अनुसूचित जमातीच्या पदवीधर उमेदवारांसाठी ४० विद्यार्थ्यांसाठी २ महिना कालावधीचा प्रशिक्षण कार्यक्रम या संस्थेमार्फत राबविण्यात येतो.<br>प्रशिक्षणार्थींना या प्रशिक्षणा दरम्यान निशुल्क निवास व्यवस्था केली जाते, तसेच प्रवास खर्च (बिल नुसार) भोजन व्यवस्था, शैक्षणिक साहित्याची सुविधा खालील दराने (DBT द्वारे) दिल्या जातात . | |
| 2. | राज्य शासनाची संशोधन अधिछात्रवृत्ती | संशोधन अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-1 | दरवर्षी दोन संशोधन अधिछात्रांना दोन वर्ष कालावधीसाठी संशोधन अधिछात्रवृत्ती मंजुर केली जाते, मानववंशशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, कृषिशास्त्र,औषधशास्त्र,इत्यादीसारख्या निरनिराळया विद्याशाखांतील व्यासंगी विद्वानांसाठी या अधिछात्रावृत्ती खुल्या आहेत. पदव्युत्तर पदवी ही | सहसंचालक दुरध्वनी क्रमांक 020/26362772 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | किमान अर्हता आहे. संशोधन अधिछात्रांच्या अर्ज प्राप्तीसाठी स्थानिक वृत्तपत्रातुन दरवर्षी सस्थेमार्फत जाहिरात प्रसिध्द करण्यात येते. जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या अर्जामधून दोन व्यक्तींची तज्ञ समितीकडून निवड करण्यात येते. निवड झालेल्या संशोधकांना किमान एक वर्ष निवडलेल्या आदिवासी क्षेत्रात सहभागी निरिक्षण करुन त्यांचा अभ्यास अहवाल दोन वर्षात संस्थेस सादर करण्यासाठी मंजुरी दिली जाते<br>या योजनेअंतर्गत संशोधन व अधिछात्रवृत्तीधारकास दरमहा रुपये 2800/- प्रमाणे अधिछात्रवृत्तीची रक्कम देण्यात येते. | |
| 3. | आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय | संग्रहालय अभिरक्षी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य,, पुणे- 1 | या कार्यालयातील आदिवासी सांस्कृतीक संग्रहालयातील अनुसूचित जमातीचया दुर्मिळ हस्तकला वस्तुचे जतन व संवर्धन करण्यात आलेले आहे. तसेच आज जनतेसाठी ते शासकीय वेळेत सशुल्क खुले करण्यात आलेले आहे. (शासकीय सुट्टी वगळून) | सहसंचालक दुरध्वनी क्रमांक 020/26362772 |
| 4. | वारली चित्रकला स्पर्धा योजना | संग्रहालय अभिरक्षी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-1 | वारली चित्रकलेस प्रोत्साहन देण्याकरिता ठाणे जिल्हयातील वारली व मल्हार कोळी जमातीतील प्रौढ कलाकार व शालेय विदयार्थी या दोन गटात वर्षातुन एकदा वेगवेगळी स्पर्धा डहाणु प्रकल्पातील आश्रमशाळेवर आयोजित करण्यात येते. संबंधित कलाकारांना मानधन प्रवास खर्च तसेच स्पर्धेसाठी लागणारे चित्रकलेचे साहित्य पुरविण्यात येते. सदर स्पर्धमध्ये भाग घेणा-या स्पर्धकांचे 1 ते 20 असे | सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे दुरध्वनी क्रमांक- 020/26362772 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | गुणानुक्रम काढण्यात येतात व शासन निर्णयानुसार रोख बक्षिस देण्यात येते.<br>अट- स्पर्धक ठाणे जिल्हयातील वारली अथवा मल्हार कोळी अनूसूचित जमातीचा असावा | |
| 5. | आदिवासी कला, संस्कृती व जीवनावर आधारित लघुपट निर्मिती करणे | संग्रहायल अभिरुक्षी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-1 | महाराष्ट्रातील आदिवासी कला, संस्कृती व जीवनावर आधारित तसेच आदिवासी विकास विभागात | सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे दुरध्वनी क्रमांक-020/26362772 |
| 6. | आदिवासी सांस्कृतिक महोत्सव | संग्रहालय अभिरक्षी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-1 | आदिवासी सांस्कृतिक महोत्सवामध्ये खालील तीन योजना एकत्रितपणे राबविल्या जातात<br>(1)आदिवासी हस्तकला प्रदर्शन (5 दिवस)<br>(2)आदिवासी पारंपारिक नृत्यस्पर्धा (1 दिवस)<br>(3) आदिवासी लघुपट महोत्सव (3 दिवस)<br>**आदिवासी हस्तकला प्रदर्शन- (5 दिवस)** आदिवासींच्या हस्तकलांना नागरी भागात बाजारपेठ उपलब्ध करुन देणे हा मुख्य उददेश व या कलाकारांना स्वयंरोजगाची संधी उपलब्ध करुन देणे, प्रदर्शनात आदिवासी कलाकारांनी तयार केलेल्या विविध कलाकृती व वस्तु विक्रीसाठी संस्थेमार्फत त्यांना स्टॉल उपलब्ध करुन देण्यात येतात. प्रदर्शनाची प्रसिध्दी संस्थेमार्फत केली जातो. आदिवासी कलाकारांना दैनिक भत्ता, प्रवासभाडे वस्तु वाहतुक खर्च व वाटचालखर्च देण्यात येतो. तसेच संस्थेमार्फत आदिवासी कलाकारांना भोजन व निवासाची सोय उपलब्ध करुन दिली जाते.<br>प्रदर्शनाची प्रसिध्दी संस्थेमार्फत केली जातो. | सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे दुरध्वनी क्रमांक-020/26362772 |

29

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | आदिवासी कलाकारांना दैनिक भत्ता, प्रवासभाडे वस्तु वाहतुक खर्च व वाटचालखर्च देण्यात येतो. तसेच संस्थेमार्फत आदिवासी कलाकारांना भोजन व निवासाची सोय उपलब्ध करुन दिली जाते.<br>**आदिवासी पारंपारिक नृत्यस्पर्धा :- (1 दिवस)**<br>आदिवासी संस्कृती जतन व संवर्धन तसेच प्रचार करण्याच्या दृष्टीने आदिवासी पारंपारिक नृत्यांची स्पर्धा संस्थेमार्फत आयोजित केली जाते. विविध भागातून 10 नृत्यपथकांना नृत्यस्पर्धेकरिता बोलविण्यात येते. उत्तम नृत्य करणा-या पथकास प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे प्रोत्साहनपर बक्षिस देण्यात येते. नृत्यस्पर्धेची प्रसिध्दी करण्यात येते. नृत्यस्पर्धेमध्ये सहभागी कलाकारांना मानधन, प्रवासभाडे व पेहराव भत्ता संस्थेमार्फत देण्यात येतो. तसेच संस्थेमार्फत देण्यात येतो. तसेच संस्थेमार्फत नृत्यस्पर्धेत भाग घेणा-या कलाकारांची निवासव भोजनाची सोय करण्यात येते.<br>**आदिवासी लघुपट महोत्सव:- (3 दिवस)**<br>आदिवासी जीवनृ कला व संस्कृतीवर आधारित या संस्थेने निर्मित केलेले लघुपट/माहितीपट नागरी भागातील नागरिकांना आदिवासींच्या कला व संस्कृतीची ओळख होण्याकरिता 3 दिवस प्रोजेक्टर हे लघुपट प्रदर्शित करण्यात येतात. | |

30

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7. | ग्रंथालय | प्रशासकीय अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-1 | संस्थेच्या ग्रंथालयात अंदाजे एकुण-21000 पुस्तके आदिवासींच्या विविध विषयावर उपलब्ध असून आदिवासींच्या विविध विषयावर संशोधन करणारे /पीएचडी करणा-या विद्यार्थ्यांना संदर्भग्रंथ म्हणून सदर पुस्तके कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन देण्यात येतात | सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे दुरध्वनी क्रमांक-020/26362772 |

टिपः- वरील सेवा व्यतिरिक्त संस्थेमार्फत अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांचे समन्वय व संनियत्रण करणे, आदि प्रमाणीच्या समन्वयाचे कामकाज पाहणे तसेच शासनाने/केंद्र शासनाने सुचविलेल्या योजनांचे मूल्यमापनांचे तसेच आदिवासी विविध विषयाबाबत संशोधन करण्याचे कामकाज करण्यात येते.

(७)

सेवा क्रमांक १

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी करणे

| अ.क्र | मुद्या | तपशील |
|---|---|---|
| १. | सेवा पुरविणारा अधिकारी | आयुक्त,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे व सहआयुक्त,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे, ठाणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर,नंदूरबार, गडचिरोली. |
| २. | कायदे/नियम/शासन निर्णय/ज्या अंतर्गत सेवा पुरविल्या जातात | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांचे कामकाज "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२००० (२००१ चा महाराष्ट्र क्र.२३) मधील तरतूदी प्रमाणे चालते. हे अधिनियम व नियम महाराष्ट्र राज्यात सर्व ठिकाणी लागू आहेत. |
| ३. | थोडक्यात कार्यपध्दती | भारतीय घटनेतील कलम क्रमांक ४५ अन्वये आदिवासी जमातींच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीकरीता विविध तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच घटनेतील विविध तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच घटनेतील ३४३ कलमातील तरतूदी अन्वये विविध राज्यात राष्ट्रपतींच्या अध्यादेशाद्वारे विविध राज्याकरीता अनुसूचित जमातींची यादी जाहिर करण्यात आलेली आहे. यादीत समाविष्ट असलेल्या अनुसूचित जमातींना शासनाने जाहिर केलेल्या विविध शैक्षणिक व आर्थिक सवलतींचा विविध योजनेद्वारे लाभ होतो.<br>अनुसूचित जमातीचे लाभ अनुज्ञेय होण्याकरीता लाभार्थ्याकडे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक ठरते. अधिनियमातील कलम २ च्या खंड (ख) द्वारे प्रदान करण्यात आलेल्य अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने जिल्हाधिका-यांकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा उपविभागीय अधिकारी (महसूल) किंवा यथास्थिती उप जिल्हाधिकारी यांना उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. सक्षम प्राधिकारी यांचेकडून जातीचा दाखला प्राप्त करुन घेण्यासाठी कोणती कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे तसेच अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी किंवा प्रमाणपत्राचा अर्ज नाकारण्यासाठी सक्षम प्राधिका-यांने अनुसरावयाची कार्यपध्दती, अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज सक्षम प्राधिका-याकडून फेटाळण्यात आला असेल, तर अर्जदारास तीस दिवसाच्या आत संबंधीत अपीलीय अधिका-यांकडे अपील करण्याची तरतूद याबाबत सर्व कार्यपध्दती उपरोक्त नियमामधील **नियम ३,४ व ८** मध्ये विशद करण्यात आलेली आहे.<br>उपरोक्त नियमांमध्ये अनुसूचित जमातीचा दावा |

| | | |
|---|---|---|
| | | करणा-या व्यक्तीस अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठीची सर्व कार्यपध्दती नियम क्रमांक ११ व १२ मध्ये विशद करण्यात आलेली आहे. |
| ४. | सेवा मिळविण्यासाठी नागरिकांची पात्रता | अर्जदार हा भारतीय नागरीक असावा. तसेच अर्जदार अनुसूचित जमातीचा असावा व त्याचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र संबंधीत अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीने पडताळणी अंती वैध ठरविलेले असावे. |
| ५. | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | सोबत जोडला आहे. |
| ६. | अर्ज कुठे उपलब्ध आहे. | ऑनलाईन https://etribevalidity.mahaonline.gov.in/ हया लिंकवर |
| ७. | अर्जाची किंमत असल्यास किती | अर्ज ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. |
| ८. | शुल्क भरावे लागते काय? किती | नाही |
| ९. | कोणती कागद पत्रे जोडावयाची | अनुसूचित जमाती प्रमाणपत्रे प्राप्त करण्याकरीता उपरोक्त नियमामधील **नियम ३(३)** नुसार अर्जदाराने कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र पडताळणी करुन घेण्याकरीता अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र तपासणी समितीस उपरोक्त नियमातील तरतूद क्रमांक **११(२)** मध्ये नमूद केलेली कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. |
| १०. | आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाईल | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठीचा अर्ज संबंधीत सक्षम प्राधिकारी १ महिन्याच्या कालावधीत निकाली काढतील.<br>अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र पडताळणीकरीता अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीस प्राप्त झाल्यांनतर अर्जदाराचा दावा सत्य असल्याबाबत समितीस खात्री पटल्यास समिती वैधता प्रमाणपत्र निर्गमित करील. अर्जदाराचा दावा समाधानकारक आढळून न आल्यास समिती प्राप्त प्रकरणी नियमातील नियम क्रमांक १२ मध्ये नमूद केलेल्या तरतूदीचा वापर करुन निर्णय घेईल. |
| ११. | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल, तो अधिकारी (अपिलीय अधिकारी) व त्यांचा दूरध्वनी क्रमांक | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र निर्गमित करण्यास संबंधीत उपविभागीय अधिका-यांनी नकार दिल्यास त्यांचे निर्णयविरुध्द संबंधीत कार्यक्षेत्रातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे उपरोक्त नियमातील कलम ८(१) अन्वये अपील करण्याची तरतूद आहे.<br>अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीने अर्जदाराने प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास अर्जदारास संबंधीत मा.उच्च न्यायालयात दार मागता येते. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी कार्यक्षेत्र, पत्रव्यवहाराचा पत्ता संशोधन अधिकारी,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे -१ ०२०-२६३३३७४३ |

| | | |
|---|---|---|
| १२. | अपिलीय अधिकारी यांच्याकडे तक्रार निकाली काढण्यासाठीचा कालावधी | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे प्राप्त झालेल्य अपिल प्रकरणी समिती तीन महिन्याच्या कालावधीमध्ये योग्य् व उचित आदेश निर्गमित करेल.<br>मा. उच्च न्यायालयात अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीच्या निर्णयविरुध्द दाखल होणा-या याचिका प्रकरणात मा.उच्च न्यायालय प्रचलित पध्दतीने कार्यवाही करते. |

*****

३४